PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Apradhi
Year:

Song: Thakale Paul Shodhit Firate
Lyricist:

थकले पाऊल शोधीत फिरते
जीवन हे हसते
हो थकले पाऊल शोधीत फिरते
जीवन हे हसते
खिन्न रिकामी झोळी घेऊन
मन हे वळवळते
हो... थकले पाऊल शोधीत फिरते
जीवन हे हसते

सर्व असूनही होय भिकारी
हृदया मधूनी आर्त पुकारी
सर्व असूनही होय भिकारी
हृदया मधूनी आर्त पुकारी
घडले हातून पाप अघोरी
काळीज तळमळते
खिन्न रिकामी झोळी घेऊन
मन हे वळवळते
हो... थकले पाऊल शोधीत फिरते
जीवन हे हसते

भास लाडके ऐकू येती
पाय कोवळे मनी रांगती
भास लाडके ऐकू येती
पाय कोवळे मनी रांगती
जीवलग हृदयी जपले जे तू
रूप तेच होते
खिन्न रिकामी झोळी घेऊन
मन हे वळवळते
हो... थकले पाऊल शोधीत फिरते
जीवन हे हसते

नको फुकाची क्षमायाचना
भोग सर्वदा खोल वेदना
नको फुकाची क्षमायाचना
भोग सर्वदा खोल वेदना
जिवंतपणी तू भोग मृत्यूला
नियती ही म्हणते
खिन्न रिकामी झोळी घेऊन
मन हे वळवळते
हो... थकले पाऊल शोधीत फिरते
जीवन हे हसते
हो... थकले पाऊल शोधीत फिरते
जीवन हे हसते

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*